# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१२/०७/२०१६.

**३) किराणा दुकानातुन सामानाची व नगदी पैश्याची चोरी. :—**

दिनांक १०/०७/२०१६ रोजी २२.०० वा ते दि. ११/०७/०१६ रोजी ०७.०० वा. दरम्यान अज्ञात चोराने फिर्यादी हेमंत इस्तारी नखाते वय ४० वर्ष, रा. अंतरगाव यांच्या अंतरगाव येथील नविन किराणा दुकानाच्या शटरला लावलेला कुलुप तोडुन व शटर अर्धवट उघडुन आत प्रवेश केला व किराणा दुकानातील किराणा सामान कतरा सुपारी ५ किलो, सोयाबीन खाद्यतेल १ टिन, निरमा पुडे १५ नग, अॅल्मनड्रॉप तेल बाटॅल ९ नग, सिन्थॉल साबुन ५ नग, ब्रिस्टॉल पॅकेट ५ नग, एपी बाम १० नग व नगदी एक, दोन व पाच रुपयाचे सिक्के कि. ४२००/—रु. असा एकुण कि. ८,६६२/—रु. चा माल चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बंडिवार पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहे.

**२) ज्युपीटर मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक ०८/०७/२०१६ रोजी १२.०० वा. दरम्यान फिर्यादी आकाश विकास काकडे वय २८ वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी याने स्वतःच्या सुभाष वार्ड येथील कृष्णा हॉटेल रेल्वे स्टेशवर असलेल्या हॉटेलच्या बाजुला ठेवलेली बिना नंबरची टिव्हीएस कंपनीची ज्युपीटर मोटार सायकल कि. ५०,६४८/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गभणे पो.स्टे. वरठी हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ११/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०१ केसस, तिन सिटर वाहनांवरती १६ केसेस व इतर वाहनांवरती ९९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**(श्री. गाडे)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत. संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस